| | |
|---|---|
| MHYA190000632021 | दाखल दिनांक - २१.०१.२०२१<br>नोंदणी दिनांक - २१.०१.२०२१<br>निकाल दिनांक - २७.०३.२०२६<br>कालावधी - ०५ वर्षे, ०२ म. ०६ दि. |

**२ रे प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, राळेगाव यांचे न्यायालयात.**
**(पिठासीन अधिकारी श्री. रामचंद्र दत्तात्रय माने)**

**सं.फौ.ख.क्र.२६/२०२१** **नि. क्र.१३**

**फॉर्म – अ**

| | |
|---|---|
| तक्रारदार / फिर्यादी | महाराष्ट्र शासन तर्फे पोलीस ठाणे वडकी, ता. राळेगाव, जि.यवतमाळ. |
| प्रतिनिधीत्व | शासनातर्फे विद्वान विधीज्ञ श्री एस. आर. उदापुरकर |
| आरोपी | **नाना दत्तुजी कांबळे,**<br>वयः ७० वर्षे, व्यवसायः मजुरी<br>रा.धानोरा ता. राळेगाव जि. यवतमाळ. |
| प्रतिनिधीत्व | आरोपींतर्फे विद्वान विधीज्ञ श्री.ए.डी.कवडे. |

**फॉर्म – ब**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख वेळ व स्थळ | दि.१९.११.२०२० रोजी मौजे धानोरा ता. राळेगाव जि. यवतमाळ. |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | १९.११.२०२० |
| दोषारोप / प्रतिकथन निश्चीत केल्याचा दिनांक | ०३.१२.२०२४ |
| पुरावा सुरु होण्याचा दिनांक | ०३.१२.२०२४ |

RDmane 27/03/2026

| | |
|---|---|
| ज्या दिवशी निकाल राखुन ठेवला तो दिनांक | निरंक. |
| न्यायनिर्णयाची तारीख | २७.०३.२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर. | निरंक. |

## फॉर्म – क

| आरोपी अ.क्र. | आरोपीचे नाव | अटकेचा दिनांक | जामीन दिल्या चा दिनांक | गुन्हा | निर्दोष / दोषी | शिक्षा ठोठाव ली | फौ.प्र.सं.च्या कलम ४२८ च्या उद्देशाने अटकेत ठेवण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **नाना दत्तुजी कांबळे** | फौ.प्र. संहिता कलम ४१(अ) प्रमाणे नोटीस दिली. | – | महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ ई प्रमाणे | निर्दोष | – | – |

## फॉर्म – ड

**फिर्यादी/बचाव पक्ष/न्यायालय/साक्षीदारांची यादी.**

**(अ) फिर्यादी साक्षीदारांची यादी.**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| सरकारी सा.क्र.१ | उमेश पंजाबराव उईके | जप्ती पंच |

**(ब) बचाव पक्ष साक्षीदारांची यादी.**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|

27/03/2026

| |
|---|
| निरंक |

**(क) न्यायालय साक्षीदारांची यादी.**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | | |

**फिर्यादी/बचाव पक्ष/न्यायालय/निशाणी क्रमांक यादी.**

**(अ) फिर्यादी नि.क्र.यादी.**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| सरकारी सा.क्र.१ | नि.क्र.१० | जप्ती पंच |
| सरकारी सा.क्र.१ | नि.क्र.११ | जप्ती पंचनाम्यावरील अनुक्रमांक २ वरील सहीस |

**(ब) बचाव पक्ष नि.क्र.यादी.**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

**(क) न्यायालय नि.क्र.यादी.**

| अ.क्र. | वर्णन | नि.क्र. |
|---|---|---|
| १ | प्रतिकथन व आरोपीची जबानी | (नि.क्र.०८) |

**(ड) मुद्देमाल वस्तु.**

| अ.क्र. | मुद्देमाल वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

## न्यायनिर्णय

(दि.२७.०३.२०२६ रोजी घोषीत)

27/03/2026

महाराष्ट्र शासन तर्फे पोलीस ठाणे वडकी, ता. राळेगाव, जि.यवतमाळ यांनी आरोपीविरुध्द अपराध क्र. २१०/२०२० नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपीविरूदध महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५(ई) च्या संपरिक्षेनुसार खटला

चालविण्यात आला आहे.

२. अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन की, फिर्यादी हे दिनांक १९.११.२०२० रोजी त्यांच्या सोबत होमगार्ड असे वाढोणा बिट परीसरामध्ये गस्तीवर असतांना त्यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की मौजे धानोरा येथे एक इसम नामे नाना दत्तुजी कांबळे रा. धारोरा ता. राळेगाव हा त्याच्या राहत्या घरी अवैधरित्या देशी दारूची चोरटी विक्री करीत आहे. फिर्यादी, पंचनाम्यात नमुद पंच अधिकारी व इतर स्टॉफ असे घटनास्थळी गेले असता तेथे एक इसम नामे नाना दत्तुजी कांबळे रा. धानोरा ता. राळेगाव जि. यवतमाळ मिळून आला. फिर्यादीने सदर इसमाच्या ताब्यातील घटनास्थळाची पाहणी केली असता फिर्यादीला आरोपीच्या ताब्यातून त्याच्या घरातील स्वयंपाक खोलीत एका प्लास्टीक थैलीत देशी दारू गोवा संत्रा नंबर १ कंपनीच्या १८० मिली क्षमतेच्या ०६ सिलबंद बॉटल मिळून आले. फिर्यादीने मुददेमाल पैकी रासायनिक परीक्षण अहवालाकामी रितसर एक नमुना वेगळा काढला. फिर्यादीने आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ ई प्रमाणे फिर्याद दाखल केली. तक्रारीच्या अनुशंगाने आरोपी विरूध्द पुरेसा पुरावा मिळुन आल्याने सदर आरोपी विरूध्द दोषारोप न्यायालयात दाखल झाले.

३. अभियोग पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता व आरोपीचे विधीज्ञ यांचा युक्तिवाद ऐकला. त्यावरून सदर खटल्याचे निर्णयासाठी पुढील वादप्रश्न उद्भवले असून त्याखाली दिलेल्या कारणमिमांसेवरून काढलेले निष्कर्ष त्यासमोर नोंदविण्यात आलेले आहेत.

27/03/2026

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की दि.१९.११.२०२० रोजी मौ. धानोरा, ता. राळेगाव जि. यवतमाळ आरोपीच्या ताब्यातून देशी दारू गोवा संत्रा नंबर १ कंपनीच्या १८० मिली क्षमतेचे ०६ पव्वे/नग मिळून आले.? | नाही. |
| २ | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे... |

## कारणमिमांसा

**४.** प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्षाने एक साक्षीदार तपासले असुन, सरकारी साक्षीदार क्रं.१ नामे, उमेश पंजाबराव उईके (जप्तीपंच) यांची साक्ष (नि.क्र.१०) वर नोंदविण्यात आली, सदर प्रकरणात बचाव पक्षातर्फे एकही साक्षीदार तपासण्यात आलेला नाही.

**मुददा क्रं १ करीता :-**

**५.** सदर मुद्याच्या अनुषंगाने अभिलेखावरील सदर साक्षीदाराचा पुरावा पाहणे आवश्यक आहे. सरकारी साक्षीदार क्रं.१ नामे, उमेश पंजाबराव उईके (जप्तीपंच) यांची साक्ष (नि.क्र.१०) वर नोंदविण्यात आली, सदर साक्षीदाराने त्यांच्या सरतापासात कथन केले की, साक्षीदार आरोपीला ओळखतो. आरोपी हा त्यांच्या गावातील रहिवासी आहे. पोलीसांनी साक्षीदाराला कोठेही जप्ती पंचनामा करण्यासाठी बोलावले नव्हते. पोलीसांनी त्यांच्या समक्ष कोणतीही कार्यवाही केली नाही. सदर साक्षीदाराने सरकारी पक्षास सहाय्य केले नाही, त्यामुळे सरकारी वकीलांनी साक्षीदाराचा उलटतपास घेतला

त्यामध्ये साक्षीदाराने नाकारले की, साक्षीदाराला दिनांक १९.११.२०२० रोजी पोलीसांनी मौजे ग्राम धानोरा ता. राळेगांव जि. यवतमाळ येथे आरोपीच्या राहत्या घरी जप्ती पंचनामाकरिता बोलाविले होते. साक्षीदार नाकारतात की, साक्षीदार पोलीस स्टॉफ सह पंचनामा करण्याकरिता घटनास्थळी गेले असता तेथे एक इसम नामे नानाजी दत्तु कांबळे मिळून आला. साक्षीदार नाकारतात की, पोलीसांनी त्यांच्या समक्ष घटनास्थळाची पाहणी केली असता आरोपीच्या राहत्या घरामध्ये स्वयंपाक रुममध्ये एका प्लास्टीक पिशवीत देशी दारू गोवा संत्रा नं. १ कंपनीचे १८० मीली क्षमतेच्या ०६ सीलबंद पव्वे अंदाजे ३१२/- रुपयाचा मुद्देमाल मिळाला. साक्षीदार नाकारतात की, त्यावेळी त्यांच्या समक्ष रासायनीक परिक्षण अहवालाकामी मुद्देमालपैकी एक १८० मीली. क्षमतेचा रितसर नमुना वेगळा काढून सिलबंद केला. साक्षीदार नाकारतात की, पोलीसांनी त्यांच्यासमक्ष जप्ती पंचनामा करून साक्षीदाराला वाचून दाखविण्यात आला, त्यानंतर साक्षीदाराने त्यावर सही केली. सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये आरोपीविरूद्ध कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही.

६. सदर प्रकरणातील अभिलेखाचे, कागदपत्राचे, साक्षीदाराच्या पुराव्याचे अवलोकन केले असता व आरोपीविरूध्दचे आरोप पाहता, सरकार पक्षाने सदर प्रकरणात स्वतंत्र साक्षीदारामार्फत आरोपीच्या ताब्यातुन दारूबंदीकामी मुददेमाल जप्त केला ही बाब अभिलेखावर आणणे गरजेचे आहे. या प्रकरणातसरकारी सरकारी साक्षीदार क्रं.१ नामे, उमेश पंजाबराव उईके (जप्तीपंच) यांची साक्ष (नि.क्र.१०) वर नोंदविण्यात आली, सदर साक्षीदाराने सरकारी पक्षास सहाय्य केले नाही. आरोपीच्या

27/03/2026

ताब्यातुन सदर प्रकरणातील मुददेमाल जप्त केला ही बाब स्वतंत्र साक्षीदारा मार्फत अभिलेखावर आलेली नाही. अश्या परिस्थीतीत आरोपीने सदरचा गुन्हा केला हे पुराव्या अभावी सिध्द होत नाही. त्यामुळे थोडक्यात सरकार पक्षाने जप्ती पंचनामा सिध्द केलेला नाही. त्यामुळे जप्त केलेली देशी दारू गोवा संत्रा नंबर १ कंपनीचे १८० मिली क्षमतेचे ०६ पव्वे/नग दारू आरोपीच्या ताब्यातून जप्त केली हे सिध्द होवू शकले नाही त्यामुळे रासायनिक परिक्षण अहवालावर विसंबुन राहता येणार नाही. सदर प्रकरणात अभियोग पक्षाने आरोपीविरूध्द कोणताही सबळ पुरावा अभिलेखावर आणलेला नाही. उपरोक्त चर्चेवरुन सरकार पक्षास आरोपीविरुध्दचे आरोप संशयाच्या पलिकडे सिध्द करण्यास अपयश आल्याने आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. म्हणून मी मुददा क्र.१ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.२ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

## **आदेश**

१. आरोपी नामे, नाना दत्तुजी कांबळे, रा.धानोरा, ता.राळेगाव जि.यवतमाळ यास महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ ई च्या आरोपातून फौजदारी प्रक्रीया संहीता १९७३ कलम २५५(१) अंतर्गत निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपीचा जामीन व बंधपत्र रदद करण्यात येतो.

३. आरोपीला आदेशीत करण्यात येते की, त्याने फौजदारी प्रक्रीया संहीता १९७३ कलम ४३७ अ प्रमाणे रक्कम रू. १५,०००/- ( पंधरा हजार रूपये ) चा जामीन व बंधपत्र दयावे.

27/03/2026

४. सदर खटल्यातील जप्त मुद्देमाल देशी दारू गोवा संत्रा नंबर १ कंपनीच्या १८० मिली क्षमतेचे ०६ नग/पव्वे अपिलाची मुदत संपल्यावर राज्य उत्पादन शुल्क विभाग, यांच्याकडे कायदेशीररित्या विल्हेवाट लावण्यासाठी पाठविण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात उद्घोषीत करण्यात आला.)

27/03/2026

दि.२७.०३.२०२६

**(श्री.रामचंद्र दत्तात्रय माने )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट क्र.२ राळेगाव जि. यवतमाळ.